# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - अनाहत नाद
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. पूनम फुटाणे

---

डोळे उघडायच्या आधीच,
ठेका ऐकला आईच्या हृदयाचा.
आणि सुरू झाला संगीत प्रवास,
आपल्या आयुष्याचा.

पहिलं हसणं झालं तालात,
पहिलं रडणं झालं सुरात,
पहिलं बोलणं उच्च रवात,
अन पहिलं पाऊलही पडलं ठेक्यात.

ओळख झाली संगीताशी,
आईच्या अंगाई गीतातून.
देवही डोलू लागला,
आजीच्या शुभंकरोतीतून

घासामागून सरले घास,
पंगतीला दोस्त होते खास.
चिऊचा चिवचिवाट, काऊची कावकाव,
मोत्याचं भू भू नि मनीचं म्याव म्याव.

बडबड गीत आणि पाढे,
म्हटले तालासुरात.
माझा आवाज मोठा,
असायचा वर्गात.

Anahat Music Therapy

# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

पानांची सळसळ,
पाण्याची खळखळ,
बांबूच्या बनात वाऱ्याचा धिंगाणा,
निसर्गानेच शिकवला, आपोआप तराणा.

पक्षांचे कूजन,
भुंग्यांचे  गुंजन,
बहरले बालपण
पायी किणकिणले पैंजण.

बाकावर धरला तबल्याचा ठेका,
व्यायाम प्रकार करताना शिट्टीचा ताल ऐका.
लता, आशा, रफी, गुलजार ही आमची दैवतं,
सगळ्या आजारांवर त्यांच्याकडे औषधं.

जेव्हा जेव्हा टेन्शन दिले अभ्यासाने,
मन शांत केले सतार आणि संतूरने.
शाळा कॉलेजात पावले थिरकली तालावर,
प्रेमात पडल्यावर सुरांचेच राज्य होते मनावर.

उभी राहिले बोहल्यावर,
सनईच्या सुरावटीसह.
गुणगुणला सखा माझा,
सुरेल संसार, रंगेल तुझ्यासह.

चाहूल लागता मातृत्वाची,
झंकारली तनु वीणा.
कसे पूर्ण होणार वर्तुळ,
बाळा तुझ्याविना?

बाळाची आणि माझी जुळली नाळ,
पोटातच धरला त्याने पायाने ताल.
पुन्हा बाल्य, शैशव, तारुण्य, वार्धक्य
सांगा, संगीता शिवाय कसं आहे शक्य?

बघता बघता आली आयुष्याची भैरवी,

Anant Music Therapy

# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

मंद आर्द्र सुरावतीने जीवन गाणे थांबवी.
संगीत सोबत माझ्या सुखात आणि दुःखात,
आयुष्याचे जगणे झाले या अनाहत नादात.

ओंकार ध्वनीत झाले आयुष्याचे सार्थक,
सुर ताल ठेका नसे,  याहून पृथक.
नाही गेले कधी संगीत वर्गात,
तरी आहे संगीत पदोपदी, माझ्या आयुष्यात.

Anahat Music Therapy